**नि. फौ. खं. क्र. ८५/२०१९** **सरकार वि. हसन**

**नि. ६७**

सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०५ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – खजीस्ता अक्मर

वय – २८ वर्षे, व्यवसायः– घरकाम

पत्ता – नया बाजार, ता. कामठी, जि. नागपूर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. जुमळे यांचे कडून सुरु**

मी आरोपींना ओळखते. ते मला त्रास देत होते म्हणून मी त्यांना ओळखते. दिनांक ३०.१२.२०१८ रोजी रात्री १०.०० वाजता आरोपी जफर हा माझ्या घरी घुसला होता. तो माझा भाऊ सद्दाम हुसेन याला ओढत बाहेर घेवून गेला. त्याच्या पाठीमागे माझे वडील गेले. माझ्या भावाला आरोपी मारत होते. त्यावेळी माझ्या भावाला वाचविण्याकरीता इतर लोक जमा झाले. त्यानंतर माझ्या भावाला घरात घेवून गेले व माझ्या आईने घराचा दरवाजा लावला. त्यावेळी जफर याचा आम्हाला आवाज येत होता, तो फोनवर म्हणत होता की 'तेरी भाभीको बोल की तीरकमान लेके चल'. त्यानंतर पाच मिनीटानंतर खूप लोक तेथे आले. आम्ही घरामध्ये तीन बहिणी, आईवडील आणि दोन भाऊ असे होतो. त्यानंतर आमच्या घराचा दरवाजा तोडला व काच तोडली. त्यानंतर हसन बासीद हा कंपाऊडवरून आमच्या घराच्या पहिल्या मजल्यावर चढण्याचा प्रयत्न करीत होता. त्यानंतर ते लोक आत आले. त्यानंतर ते सर्वांना मारहाण करू लागले. मला मुबशेरा, सय्यदा, सादीका यांनी मारहाण केली. सादीका हिने माझे केस जोरात धरून ओढले, त्यामुळे मला चक्कर आली. माझ्या आईच्या पोटावर गुड्डो याने मारहाण केली. माझी लहान बहिणीला देखील मारहाण करीत होते. माझ्या भावाला जफरने त्याच्या अंगठ्यावर काचेने मारले होते. त्यानंतर घटनास्थळी पोलीस आले. परंतु पोलीसांनी त्यांना पकडले नाही. त्यानंतर पोलीस आम्हाला दवाखान्यात घेवून गेले व त्यानंतर पोलीस ठाण्यात घेवून गेले. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती, परंतु बयाण नोंदविला नाही. न्यायालयात आरोपी जफर हजर आहे. इतर आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकेल.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. भिमटे यांच्याकडून**

२. आरोपी आमच्या घराच्या पाठीमागे राहते. रहिसाबानो ही माझी आई आहे. हे म्हणणे खरे आहे की साक्षिदार माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझी बहिण जैनासबा हिला जनावरे पाळण्याची आवड आहे. आम्ही सर्व एकत्र राहतो. आमचे घर दोन मजली आहे. आरोपींचे देखील दोन मजली घर आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपींचे व आमचे घर एकमेकांना लागून आहेत. माझे शिक्षण १२वी इतके झाले आहे. आमच्या घरी सध्या १७ मांजरे आहेत. मी व माझी बहिण जैनासबा मांजरांची देखभाल करतो. मी, माझी बहिण व सर्व मांजर पहिल्या मजल्यावर राहतो. जेव्हा गरज असेल तेव्हा आम्ही जनावरांच्या डॉक्टरांकडून मांजरांची तपासणी करून घेतो. हे म्हणणे खरे

नाही की जनावरे पाळण्याची नगरपरिषदेकडून परवानगी घ्यावी लागले. परवानगी घ्यावी लागत नाही म्हणून आम्ही परवानगी घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की मांजरांमुळे आजुबाजुच्या अनेक मांजर येत जात असतात. हे मला माहित आहे की मांजरांची लाळ व नखे ही धोकादायक असतात. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घराशेजारी लोकांची राहती घरे व वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घराशेजारी लहान मुले व वयस्क लोक राहतात. हे म्हणणे खरे नाही की मांजर एका ठिकाणी न खाता ते दुस–या ठिकाणी घेवून जावून खातात. हे म्हणणे खरे आहे की आम्ही मांजरांना रोज मटन व अंडी देतो. हे म्हणणे खरे नाही की आम्ही मांजरांनी केलेला सर्व कचरा बाहेर फेकतो. हे म्हणणे खरे नाही की मांजर मटन वगैरे घेवून आरोपींच्या घरी जावून खातात.

**प्रश्नः–** मांजर आरोपींच्या घरी जावून घाण करीत असल्यामुळे आरोपींनी आम्हाला येवून समजावून सांगितले होते ?

**उत्तरः–** नाही, उलट आरोपींनी आम्हाला धमकी दिली होती.

३. हे म्हणणे खरे नाही की आमच्या घरातील मांजरामुळे आजुबाजुच्या सर्व लोकांना त्रास होत होता. हे मला माहिती नाही की आमच्याविरुध्द आजुबाजुच्या सर्व लोकांनी एकत्रीत सही करून पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपीच्या घरी एकत्र कुटुंब असून लहान मुले व वृध्द लोक आहेत. हे म्हणणे खरे नाही की आमच्या मांजरांनी आरोपींच्या लहान मुलांना ओरखडले होते. आम्ही किती कुत्रे पाळलेले आहेत हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की चार ते पाच मांजर घराच्या पाठीमागे असतात. मांजरांचे लसीकरणाचे प्रमाणपत्र आम्ही पोलीसांना दिले नव्हते. हे मी सांगू शकत नाही की आमच्या कडील मांजर हे विशेष प्रजातीचे आहे किंवा नाही. हे मला माहिती नाही की मांजरांबद्दलची तक्रार आजुबाजुच्या लोकांनी नगरपरिषेदला देखील केली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी नगरपरिषद व पोलीसांमध्ये तक्रार केली म्हणून आम्ही आरोपींना खोट्या गुन्ह्यात फसविण्याची धमकी दिली होती.

४. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील आरोपींनी मला, माझ्या भाऊ, माझी बहिण व माझी आई यांना मारहाण केल्याबाबतचा सांगितलेला सर्व मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात सांगितलेली कोणतीही घटना झाली नाही.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

SAGAR SHAM JADHAV
Digitally signed by SAGAR SHAM JADHAV
Date: 2024.12.31 11:02:12 +0530

**(सागर एस. जाधव)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**

**ठिकाण –कामठी**

**दिनांक – ३०.१२.२०२४**